| साहसी उपक्रम धोरण<br>(मॅक च्या सुधारणांसहित) | मॅक च्या सूचना |
|---|---|
| | सदर मसुद्याची लांबी, तांत्रिक क्लिष्टता लक्षात घेता सूचना / हरकती ह्यासाठी दिलेला वेळ वाढविण्यात यावा. |
| प्रस्तावना:<br>महाराष्ट्रात कोकण किनारा, पश्चिम घाटातील पर्वतराजी, विदर्भ या वैविध्यपूर्ण प्रदेशात पाणी, जमीन व हवेतील साहसी पर्यटनास मोठ्या प्रमाणावर वाव आहे. साहसी पर्यटन हे क्षेत्र पर्यटनाचे लोकप्रिय अंग असून ~~पर्यटकांचा~~ साहसी पर्यटनास मोठ्या प्रमाणावर वाव आहे. साहसी पर्यटन हे क्षेत्र पर्यटनाचे लोकप्रिय अंग असून पर्यटकांचा साहसी पर्यटनाकडे कल वाढत जात आहे. पर्यटन धोरण 2016 अंतर्गत साहसी पर्यटनाला चालना देणे तसेच साहसी पर्यटन आयोजित करणाऱ्या संस्था, ॲडव्हेंचर टूर ऑपरेटर्स, साहसी क्रीडा संदर्भात प्रशिक्षण देणाऱ्या संस्था/संघटना, क्लब यांची नोंदणी, विनियमन, सनियंत्रण, नियोजन, प्रोत्साहन देणे, प्रशिक्षण देणे इत्यादी बाबींचा समावेश करण्यात आला आहे. | वाक्याची रचना चुकली आहे. |
| हिमालयात पदभ्रमणासाठी गेलेल्या दोन मुलांचा मोहिमे दरम्यान मृत्यू झाला होता. त्यासंदर्भात त्यांच्या पालकांनी 2007 साली मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केल्या होत्या. या बाबत माननीय उच्च न्यायालयाने 12.07.2013 रोजी विविध साहसी उपक्रमात भाग घेणाऱ्या लोकांची, मुलांची सुरक्षितता यावर विस्तृत धोरण/मार्गदर्शक सूचना अथवा नियम करावेत असा निर्णय दिला. | |
| साहसी क्रीडा प्रकारातील गिर्यारोहण, माऊंटनिअरिंगमध्ये, स्किईंग, स्नोबोर्डींग, पॅरासेलिंग, हॅंग्लायडींग, जलक्रीडा आयोजन करणाऱ्या संस्थांसाठी मार्गदर्शक सूचना संदर्भाधीन दि. 26.06.2014 च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आल्या होत्या. उपरोक्त शासन निर्णयाच्या संदर्भात श्री. वसंत लिमये व इतर यांनी मुंबई उच्च न्यायालयामध्ये रिट याचिका क्र. 8304/2014 दाखल केली. त्यानुसार दि. 26-06-2014 च्या शासन निर्णयामध्ये विविध त्रुटी असल्याने त्याच्या अंमलबजावणीमध्ये व्यवहारिक अडचणी उद्भवून सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी करणे शक्य होणार नसल्याची बाब सदर याचिकेमध्ये प्रामुख्याने उपस्थित करण्यात आली आहे. तसेच साहसी क्रीडा प्रकारात भाग घेणाऱ्यांच्या सुरक्षिततेबाबत मार्गदर्शक सूचना विहीत करण्यासाठी जमिनीवरील, हवाई आणि जल साहसी क्रीडा प्रकारातील प्रत्येकी 2 तज्ज्ञांचा समावेश असलेली समिती नियुक्त करण्याच्या मागणीचा अंतर्भाव सदर याचिकेमध्ये करण्यात आला आहे. | |

| | |
|---|---|
| पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या दि. 26.06.2014 च्या शासन निर्णयामध्ये आवश्यक सुधारणा करून साहसी क्रीडा प्रकारातील जमिनीवरील, हवाई व जल क्रीडा आयोजित करणाऱ्या संस्था/व्यक्ती यांच्याबाबत नियम/ मार्गदर्शक सूचना विहित करण्याच्या दृष्टीने शासनास शिफारशी करण्याकरिता आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने सुधारीत शासन निर्णयाचा मसुदा शासनास सादर केला होता. या अनुषंगाने दि. 26 जुलै, 2018 चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. उपरोक्त शासन निर्णयाच्या संदर्भात श्री. वसंत लिमये व इतर यांनी मुंबई उच्चन्यायालयामध्ये पुन्हा रिट याचिका क्र. 490/2019 दाखल केली. मा. उच्च न्यायालयाने रिट याचिका संदर्भात सुनावणी घेऊन योग्य कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. | |
| मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशांन्वये दि. 05.02.2020 रोजी अतिरिक्त मुख्य सचिव (क्रीडा) यांच्या अध्यक्षतेखाली प्रधान सचिव (पर्यटन) व संबंधित याचिकाकर्ते समवेत सुनावणी घेण्यात आली. या सुनावनीदरम्यान याचिकाकर्ता तथा अध्यक्ष महा ॲडव्हेंचर कांउसिल यानी दि. 26 जुलै 2018 रोजीच्या शासननिर्णयासंदर्भातील विविध सूचना आणि त्यातील त्रुटींमुळे निर्माण होऊ शकणाऱ्या व्यावहारिक अडचणींबाबत निवेदन सादर करण्यात आले. सदर सुनावणी साहसी ~~पर्यटन~~ हा पर्यटन विभागाचा विषय असल्याने साहसी ~~पर्यटना~~बाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी व सदरचा विषय पर्यटन विभागाकडे वर्ग करण्यात येत असल्याचा निर्णय झाला. | मसुद्यात अनेक ठिकाणी 'साहसी पर्यटन' अशी शब्दयोजना आलेली आहे. गोंधळ टाळण्यासाठी त्या ठिकाणी 'साहसी उपक्रम' असा बदल करावा. |
| दि. 05 मे 2020 रोजी प्रधान सचिव (पर्यटन) यांच्या अध्यक्षतेखाली ॲडव्हेंचर टूर ऑपरेटर्स असोसिएशन ऑफ इंडिया (ATOAI) च्या प्रतिनिधी समवेत बैठक पार पडली. ॲडव्हेंचर टूर ऑपरेटर्स असोसिएशन ऑफ इंडिया (ATOAI) मार्फत तयार करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांना पर्यटन मंत्रालय, भारत सरकार यांनी ~~मान्यता देण्यात आली असून~~ या मार्गदर्शक सूचनांचा संदर्भ घेऊन तसेच साहसी उपक्रमांशी संबंधित ISO 21101 आणि BIS IS/ISO 21101:2014 मानकांशी मेळ घालून महाराष्ट्र शासनाने जमीन, हवा आणि पाणी या माध्यमांकरिता विविध साहसी उपक्रम आयोजनाशी संबंधित विस्तृत अशा सुरक्षा मार्गदर्शक सूचना तयार केल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचना सोबतच्या प्रपत्र "अ, ब, क, ड, व इ" मध्ये नमूद करण्यात आल्या आहेत. | ATOAI च्या मार्गदर्शक सूचनांची पर्यटन मंत्रालय, भारत सरकार ह्यांनी शिफारस केली आहे.<br><br>सुरक्षा मार्गदर्शक सूचना सदर धोरणातून वगळाव्या. मार्गदर्शक सूचना हया वेळोवेळी बदलत असल्याने स्वतंत्र पणे जाहीर कराव्यात. विविध साहसी क्षेत्रातील घडणारे बदल, तज्ञांच्या सल्ल्याने अंतर्भूत करता येतील. |

| | |
|---|---|
| शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने दि. 26 जुलै 2018 रोजी निर्गमित केलेला शासननिर्णय अधिक्रमित करण्यात येत आहे. हे धोरण संपूर्ण महाराष्ट्र राज्याकरिता लागू राहील. महाराष्ट्रात सध्या कार्यरत व भविष्यात नव्याने सुरु करू पाहणाऱ्या सर्व साहसी उपक्रमांसाठी हे धोरण लागू राहील. अशा सर्व उप्रकमांसाठी नोंदणीची कार्यवाही बंधनकारक राहील. | |
| **(अ) साहसी ~~पर्यटन~~ धोरणा अंतर्गत खालील घटकांना नोंदणी करणे बंधनकारक राहील**. | पर्यटन ऐवजी उपक्रम |
| 1. साहसी उपक्रम आयोजित करणाऱ्या खालील दिलेल्या संस्था/ व्यक्ती/संघटना यांना नोंदणी करणे व नमूद केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहील. | |
| 2. प्रस्तावित शासन निर्णय आयोजित साहसी उपक्रमांसाठीच (Organised Adventure Activity) लागू असेल. ज्या संस्था, व्यक्ती अथवा व्यक्ती समूह जमीन, हवा किंवा पाणी या माध्यमातील कुठल्याही प्रकारचा साहसी उपक्रम आयोजित करण्यात कार्यरत असतील, जिथे आयोजक आणि सहभागी अशी सुस्पष्ट विभागणी असेल अशा सर्व आयोजकांनी या शासन निर्णयांतर्गत नोंदणी करणे आवश्यक आहे. | |
| 3. या आयोजकांची वर्गवारी खालीलप्रमाणे : | |
| 1. साहसी पर्यटन आयोजित करणाऱ्या संस्था (Adventure Tour Operator) वैयक्तिक मालकी (Proprietership Act) / भागीदारी व्यवसाय (Partnership Act) व्यक्ती अथवा कंपनी कायदा 1956 अंतर्गत नोंदणीकृत असलेल्या संस्था. | |
| 2. साहसी उपक्रम आयोजित करण्यासाठी आपल्या सेवा उपलब्ध करून देणारे संबंधित सेवा दाते. | |
| 3. ना नफा तत्त्वावर चालणाऱ्या संस्था / धर्मादाय संस्था / हौशी आयोजक / क्लब | |
| 4. साहसी उपक्रम संकलक (व्यक्ती आणि संस्था) (Aggregators) | |
| 5. साहसी उपक्रम आयोजित करणारे कॅम्प्स/रिसॉर्ट (Camps/Resorts Organising Adventure Activities) | |
| 6. साहसी उपक्रमासंबंधित प्रशिक्षण देणाऱ्या संस्था (Training Institutes and Organizations) | |
| 7. साहसी उपक्रम आयोजित करणाऱ्या आयोजकांच्या विविध संघटना (Associations of organisations involved in adventure activities) | |

| | |
|---|---|
| 8. साहसी उपक्रम आयोजन करणाऱ्या व्यक्ती | |
| **ब. नोंदणी कार्यपद्धती :** साहसी उपक्रम आयोजन नोंदणीकरिता खालीलप्रमाणे कार्यपद्धती राहील. | |
| 1. तात्पुरते नोंदणी प्रमाणपत्र : तात्पुरते नोंदणीप्रमाणपत्र हे सर्व प्रकारच्या साहसी उपक्रमांकरिता बंधनकारक आहेत. सध्या साहसी उपक्रम आयोजित करणाऱ्या तसेच साहसी उपक्रम आयोजित करू इच्छिणाऱ्या व्यक्ती/संस्था/कंपनी, इत्यादी तात्पुरते नोंदणी प्रमाणपत्र करिता नोंदणी करणे बंधनकारक राहील. प्राप्त अर्जाची छाननी करून संचालक कार्यालयामार्फत तात्पुरते नोंदणीप्रमाणपत्र निर्गमित करण्यात येईल. सदर नोंदणीप्रमाणपत्राची वैधता निर्गमित केल्याच्या दिनांकापासून 1 वर्ष राहील. | |
| तात्पुरत्या नोंदणी कालावधी दरम्यान संबंधित नोंदणीधारकांमार्फत प्रमाणित साहसी क्रीडा साहित्य, प्रशिक्षित कर्मचारी वर्ग, आवश्यक असलेले पायाभूत सोयी-सुविधा व मार्गदर्शक व सर्वसाधारण सूचनांनुसार कार्यवाही पूर्ण करावी. तात्पुरत्या नोंदणी प्रमाणपत्रास अपवादात्मक परिस्थितीत कारणमीमांसा करून 6 महिन्यांची एकदाच मुदत वाढ देण्यात येईल. तद्नंतर मुदतवाढ देण्यात येणार नाही. स्वयंघोषणापत्राच्या आधारे आयोजकांना स्वत:च्या जोखमीवर या धोरणांतर्गत मार्गदर्शक व सर्वसाधारण सूचनांनुसार साहसी उपक्रम सुरु ठेवता येतील. | |
| जमिनीवरील साहसी उपक्रम, जल साहसी उपक्रम व हवाई साहसी उपक्रम आयोजन करणारे घटक तात्पुरते नोंदणीप्रमाणपत्राकरिता विहीत नमुन्यातील अर्जासोबत रु. 1000/- शुल्कासह खालील नमूद केलेल्या कागदपत्रांसह ऑनलाईन अर्ज संचालक, पर्यटन संचालनालय कार्यालयाकडे सादर करतील. ज्या साहसी उपक्रम धारकांना ऑनलाईन अर्ज करणे शक्य नसेल अशांकरिता पर्यटन संचालनालयाच्या मुख्यालय व त्या अधिनिष्ठ उपसंचालक (पर्यटन) प्रादेशिक कार्यालयांतर्गत ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. अर्जासोबत सादर करावयाचे कागदपत्रे. | विहित नमुन्यातील अर्जाचा अंतिम धोरणात समावेश करावा लागेल. तात्पुरत्या नोंदणी प्रमाणपत्रासाठी नोंदणी शुल्क ५००/- असावे. |
| 1. संस्था / कंपनी नोंदणी प्रमाणपत्र. | लागू असलेली कागदपत्रेच अर्जा सोबत जोडावीत. नोंदणी करणारे सेवादाते, साहसी उपक्रम संकलक व्यक्ती आणि साहसी उपक्रम आयोजक व्यक्ती ह्यांना संस्था / कंपनी नोंदणी प्रमाणपत्र, गुमास्ता परवाना ह्या बाबी लागू नाहीत. |
| 2. पॅन कार्ड | |
| 3. आधार कार्ड | |
| 4. गुमास्ता परवाना | |
| 5. वीज बील/घरभाडे/ पाणीपट्टी/टेलिफोन बील/रेशनकार्ड | |
| 6. जागा/भाडेतत्त्वावर असेल तर त्याबाबतच्या करारनामाची प्रत | |

| | |
|---|---|
| 7. आयकर विवरण प्रमाणपत्र | |
| 8. ज्या साहसी पर्यटन प्रकाराकरिता नोंदणी करावयाची आहे त्याची माहिती. | |
| 9. सुरक्षा मार्गदर्शक नियमावलीचे पालन करण्याचे हमीपत्रक. | |
| तात्पुरते नोंदणी प्रमाणपत्र :<br>i. जमीन, हवा आणि पाणी यावरील साहसी उपक्रम आयोजनाकरीता सध्या कार्यरत असलेल्या सर्व साहसी उपक्रम आयोजकांनी शासन निर्णय निर्गमित झाल्या दिवसापासून सहा महिन्यांचे आत आणि भविष्यात असा उपक्रम सुरु करण्यापूर्वी तात्पुरती नोंदणी करणे आवश्यक आहे. एक विशेष बाब म्हणून तात्पुरते नोंदणीकरण करण्यासाठी दिलेल्या सदर सहा महिन्याच्या कालावधीत सध्या कार्यरत साहसी उपक्रम आयोजकांना उपक्रम सुरु ठेवण्याची सूट देण्यात येत आहे.<br>ii) सदर शासन निर्णय जारी केल्याच्या दिनांकानंतर सहा महिन्यांनी साहसी उपक्रम आयोजनाला नवीन सुरवात करणाऱ्या आयोजकांनी तात्पुरते नोंदणी प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे. तात्पुरत्या नोंदणीपत्रासाठी अर्ज केल्यानंतरच साहसी उपक्रम सुरु करता येतील. | सध्या कार्यरत साहसी उपक्रम आयोजकांना उपलब्ध मुदत आणि उपक्रम सुरु ठेवण्याबाबत तसेच नव्या आयोजकांसाठी असलेल्या सूचना सुस्पष्टपणे कळण्यासाठी |
| 2. अंतिम नोंदणी प्रमाणपत्र : अंतिम नोंदणी प्रमाणपत्राचे निकष शासनास धोरण जाहीर झाल्यानंतर ६ महिन्याच्या कालावधीत तयार करुन प्रसिध्द करावे लागतील. ह्यात साहसी क्षेत्रातील तज्ञ आणि राज्यस्तरीय समिती यांची महत्त्वाची भुमिका असेल.<br>सदर अर्ज अधिकृत आणि जबाबदार व्यक्तीनेच करायचा आहे. तात्पुरत्या नोंदणी प्रमाणपत्राचा कालावधी संपण्याच्या कमीत कमी 60 दिवस आधी संचालक कार्यालयाकडे आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह अंतिम नोंदणी प्रमाणपत्राकरिता अर्ज करावा. तात्पुरत्या नोंदणी प्रमाणपत्राचा कालावधी संपल्यानंतर अंतिम नोंदणी प्रमाणपत्राचा प्राप्त झालेले अर्ज नाकारण्याचा अधिकार संचालक, पर्यटन संचलनालय यांच्याकडे राखून ठेवण्यात येत आहे. | अंतिम नोंदणी प्रमाणपत्राचे निकष शासनास धोरण जाहीर करणे आवश्यक आहे.<br><br>अर्ज करणारी व्यक्ती अधिकृत आणि जबाबदार असणे सुरक्षा नियमावली लागू करण्यासाठी अत्यावश्यक आहे. |
| अंतिम नोंदणी प्रमाणपत्राकरिता प्राप्त झालेले अर्जाची छाननी व स्थळ पाहणी खालील गठीत विभागीय समितीमार्फत करण्यात येईल. प्राप्त अर्जावर 30 दिवसांच्या आत कार्यवाही करुन शिफारसीसह अर्ज संचालक, पर्यटन संचालनालयाकडे अंतिम नोंदणीप्रमाणपत्राकरिता पाठवतील. | |
| विभागीय समिती रचना | |

| **अनु.क्र.** | **संस्था / पदनाम** | **समितीमधील पद** |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| 1 | संबंधित उपसंचालक, पर्यटन | अध्यक्ष |
| 2 | संबंधित पोलीस उपअधीक्षक /प्राधिकृत केलेला वरिष्ठ दर्जाचा प्रतिनिधी | सदस्य |
| 3 | वनपरिक्षेत्र अधिकारी / प्राधिकृत केलेला वरिष्ठ दर्जाचा प्रतिनिधी | सदस्य |
| 4 | संबंधित कार्यकारी अभियंता (जलसंपदा / सार्वजनिक बांधकाम / महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड) | सदस्य |
| 5 | पर्यटन संचालनालयाच्या नामिकासुचीतील तज्ञ. (3 + 1 +1 अनुक्रमे जमीन, हवा, पाणी क्षेत्रातील तज्ञ) | सदस्य |
| 6 | उपअभियंता, प्रादेशिक पर्यटन कार्यालय | सदस्य सचिव |

| | |
|---|---|
| विभागीय समितीची कार्यकक्षा<br>1. तात्पुरत्या नोंदणीप्रमाणपत्राच्या आधारे, अंतिम नोंदणीप्रमाणपत्राकरीता प्राप्त झालेल्या अर्जाची सर्वसाधारण सूचना व ज्या साहसी उपक्रमाकरिता अर्ज प्राप्त झाला आहे, त्या साहसी क्रीडाप्रकाराच्या मार्गदर्शक सूचनांनुसार छाननी करणे.<br>2. प्रत्यक्ष स्थळी जाऊन साहसी उपक्रम साहित्यांची / प्रशिक्षक कर्मचारी वर्ग / मुलभूत सोयी-सुविधा व इतर आनुषंगिक बाबींचा स्थळ पाहणी करणे.<br>3. स्थळ पाहणी अहवालासह अंतिम प्रमाणपत्राकरीता पात्र घटकांचा अहवाल अभिप्रायासह संचालक, पर्यटन संचालनालयाकडे सादर करणे.<br>4. अनधिकृत साहसी उपक्रम आयोजन करणाऱ्या संस्था बंद / फौजदारी कारवाई करणे. याबाबतचा अहवाल संचालक, पर्यटन संचालनालय यांना सादर करणे.<br>5. साहसी उपक्रम आयोजना दरम्यान अपघात झाल्यास सदर अपघाताची चौकशी करणे, चौकशी / तपासणीअंती संबंधिता विरुद्ध उचित कारवाई करणे.<br>6. विभागीय साहसी पर्यटन संघटना व शासन यांच्यामध्ये समन्वय साधणे.<br>7. साहसी पर्यटन धोरणाची योग्य अंमलबजावणीसाठी सर्वतोपरी सहाय्य करणे.<br>8. साहसी उपक्रम प्रकारांची जिल्ह्यातील विभागातील सुरुवात, प्रसार, प्रगती व महत्वपूर्ण कामगिरी इत्यादी माहितीचे संकलन करणे. | मुद्दे क्रमांक १, २, ३ ह्यातील तपासणी प्रक्रिया कमी जाचक आणि सुस्पष्ट असावी. अंतिम नोंदणी प्रमाणपत्राच्या प्रसिध्द केलेल्या निकषांनुसार अर्जांची छाननी आणि आवश्यक असल्यास प्रत्यक्ष पाहणी करावी.<br><br>४ नंबर मुद्द्यातील फौजदारी कारवाई ऐवजी 'काळ्या यादीत नाव टाकणे'.<br><br>५ नंबर मुद्दा - अपघाताची चौकशी तज्ज्यांच्या सहाय्याने करावी. |

अंतिम प्रमाणपत्राबाबत करावयाची कार्यवाही:

संचालक, पर्यटन संचालनालय यांच्या कार्यालयात साहसी पर्यटनाकरिता एक स्वतंत्र कक्षाची स्थापना करण्यात येईल. संचालक हे या कक्षाचे कक्ष प्रमुख राहतील. उपसंचालक कार्यालयाकडून प्राप्त अर्जांची कक्षांमार्फत छाननी करून सदर अर्ज मान्यतेकरिता साहसी पर्यटन नोंदणीकरिता गठीत समितीकडे सादर करतील. उपसंचालक कार्यालयामार्फत प्राप्त अर्जाच्या दिनांकापासून 30 दिवसांत कक्षामार्फत नोंदणी घेण्यात येईल.

सदर कक्षास काही त्रुटी आढळल्यास सदर अर्ज त्रुटींसह 7 दिवसांत उपसंचालक कार्यालयास त्रुटींच्या पुर्ततेकरिता परत पाठविण्यात येईल. अशा अर्जांवर उपसंचालक कार्यालय 15 दिवसांत त्रुटींची पूर्तता करून अर्ज संचालक, पर्यटन संचालनालय कार्यालयास सादर करतील.

विभागीय समितीने शिफारसीसह अंतिम प्रमाणपत्राकरिता पाठविण्यात आलेल्या प्रस्तावनेची छाननी करून खालील गठीत केलेले साहसी पर्यटन कक्षाच्या अंतिम निर्णयानंतर अंतिमप्रमाणपत्र निर्गमित करणेबाबत उचित कार्यवाही करेल. अंतिम नोंदणी प्रमाणपत्र निर्गमित करण्याबाबातचे निकष 6 महिन्यांच्या कालावधीत तयार करून मंजुरीकरिता राज्यस्तरीय समितीसमोर ठेवण्यात येईल.

**साहसी पर्यटन कक्ष**

| **अनु.क्र.** | **संस्था / पदनाम** | **कक्षामधील पद** |
|---|---|---|
| 1 | संचालक, पर्यटन | अध्यक्ष |
| 2 | सहसंचालक, पर्यटन | सदस्य |
| 3 | पर्यटन संचालनालयाच्या नामिकासुचीतील तज्ञ. (3 + 1 +1 अनुक्रमे जमीन, हवा, पाणी क्षेत्रातील तज्ञ) | सदस्य |
| 4 | सहाय्यक संचालक (विकास) | सदस्य सचिव |

**साहसी पर्यटन कक्षाची कार्यकक्षा**

1. विगागीय समितीमार्फत प्राप्त प्रस्तावाची सर्वंकष छाननी करणे
2. छाननी अंती अंतिम प्रमाणपत्र देण्यासंदर्भात निर्णय घेणे
3. साहसी पर्यटन धोरण राबविण्यासंदर्भात येणाऱ्या अडीअडचणी सोडविण्याकरिता राज्यस्तरीय समितीस शिफारस करणे
4. साहसी पर्यटन धोरणाची प्रसिद्धी व प्रचलनाबाबत कार्यवाही करणे

ह्यात आणखी एक ७ वा मुद्दा सावा. साहसी उपक्रमांच्या संदर्भात घ्याव्या लागणाऱ्या परवानग्यांसाठी 'एक खिडकी' योजना राबवावी. ह्यासाठी पर्यटन मंत्रालयाने वन, पुरातत्व, क्रीडा

| | |
|---|---|
| 5. साहसी पर्यटन क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींचा नामिकासूचीकरिता मार्गदर्शक सूचना तयार करणे व नामिकासूचीला मान्यता देणे. | विभाग आणि MMB, DGCA सारख्या संस्था ह्यांच्याशी समन्वय साधावा.<br><br>नामिकासूची राज्यस्तरीय समितीने मान्य करावयाची आहे. |
| 6. नोंदणीकृत साहसी पर्यटन संस्थांपैकी ज्या संस्था तारांकीत दर्जाच्या सुविधा पर्यटकांना उपलब्ध करून देतील त्या आधारे त्या संस्थेस तारांकीत दर्जा बहाल करण्याची कार्यवाही करेल. | |
| **नोंदणी कालावधी** | |
| साहसी पर्यटन अंतिम नोंदणीप्रमाणपत्राचा कालावधी प्रथम 3 वर्षे एवढा असेल. नोंदणी कालावधी संपण्याच्या 45 दिवस आधी नूतनीकरणाकरिता ऑनलाईन अर्ज करावा लागेल. | |
| **नोंदणी शुल्क** | |
| 1. अंतिम मान्यताप्रमाणपत्राकरिता प्रती साहसी उपक्रम माध्यमासाठी (जमीन, हवा आणि पाणी अशी माध्यमे आहेत. नोंदणी शुल्क प्रत्येकी रु. 3000/- असेल. म्हणजे एक अर्जदार जर जमीन, हवा आणि पाणी यापैकी फक्त एका साहसी उपक्रमाच्या माध्यमासाठी नोंदणी अर्ज करीत असेल तर त्याला रु. 3000/- एवढे नोंदणी शुल्क भरावे लागेल. | मुद्दा क्रमांक १ - ३०००/- ऐवजी १५००/- असावे. |
| 2. अर्जदार जर एकापेक्षा जास्त साहसी उपक्रम माध्यमासाठी नोंदणी अर्ज करत असेल तर त्याला रु. 6,000/- दोन) माध्यमांसाठी किंवा (रु. 9,000 तीन) माध्यमांसाठी शुल्क (भरावे लागेल. | मुद्दा क्रमांक २ - ६०००/- ऐवजी ३०००/- आणि ९०००/- ऐवजी ४५००/- असावे. |
| 3. हवा आणि पाणी या माध्यमातील साहसी उपक्रमासाठीचे अंतिम नोंदणी शुल्क हे एका ठिकाणाकरिता असेल आणि असे ठिकाण नोंदणीपत्रात नमूद केलेले असेल. एका ठिकाणापेक्षा जास्त ठिकाणी त्याच माध्यमातील साहसी उपक्रम आयोजित करण्यासाठी, अतिरिक्त ठिकाणासाठी रु. 1,500/- प्रत्येकी असे नोंदणी शुल्क भरावे लागेल. | मुद्दा क्रमांक ३ - १५००/- ऐवजी ७५०/- असावे. |
| 4. सदर शुल्काचा Gras प्रणालीद्वारे भरणा करावा लागेल. | |
| **नूतणीकरण शुल्क** | |

| | |
|---|---|
| 1. प्रति साहसी उपक्रम माध्यमासाठी नुतनीकरण शुल्क रु.२०००/- असेल (म्हणजे एक अर्जदार जर जमीन, हवा आणि पाणी यापैकी फक्त एका साहसी उपक्रमाच्या माध्यमासाठी नोंदणीपत्राच्या नूतनीकरणासाठी अर्ज करीत असेल तर त्याला रु. २०००/- एवढे नोंदणी शुल्क भरावे लागेल.) | मुद्दा क्रमांक १ - २०००/- ऐवजी १०००/- असावे. |
| 2. अर्जदार जर एकापेक्षा जास्त साहसी उपक्रम माध्यमासाठी नोंदणी पत्राच्या नूतणीकरणासाठी अर्ज करत असेल तर त्याला रु. ४,०००/- किंवा रु. ६,०००/- शुल्क भरावे लागेल. | मुद्दा क्रमांक २ - ४०००/- ऐवजी २०००/- आणि ६०००/- ऐवजी ३०००/- असावे. |
| 3. तसेच हवा आणि पाणी या माध्यमातील साहसी उपक्रमासाठीचे नूतनीकरण शुल्क हे एका ठिकाणाकरिता असेल आणि असे ठिकाण नोंदणीपत्रात नमूद केलेले असेल. एका ठिकाणापेक्षा जास्त ठिकाणी साहसी उपक्रम आयोजित करण्यासाठी प्रत्येक अतिरिक्त ठिकाणासाठी नूतनीकरण शुल्क रु.२,०००/- भरावे लागेल. | मुद्दा क्रमांक ३ - २०००/- ऐवजी १०००/- असावे. |
| 4. सदर शुल्काचा Gras प्रणालीद्वारे भरणा करावा लागेल. | |
| **विमासंदर्भातील तरतुदी** | |
| साहसी उपक्रमात सहभागी होणाऱ्या व्यक्ती तसेच प्रत्यक्ष उपक्रमाच्या जागी असणाऱ्या आयोजकांकडे पुरेसे विमा संरक्षण असणे आवश्यक आहे. सुरक्षा नियमावलीत शिफारस केल्याप्रमाणे साहसी उपक्रमातील सर्व धोके, पुरेसे विमा संरक्षण आणि त्याची गरज याची पूर्ण माहिती आयोजकांनी सहभागींना उपक्रमापूर्वी देणे गरजेचे आहे. सहभागी, उपक्रमात सहभागी होणारे कर्मचारी, आयोजक आणि व्यावसायिक (स्थायी, कराराधीन अथवा इतर) यांच्या विमा संरक्षणाबाबत सुरक्षा नियमावलीचे पालन करणे ही आयोजकांची जाबाबदारी असेल. | |
| **वार्षिक अहवाल** | |
| प्रत्येक नोंदणीपत्र धारकाला दरवर्षी 31 मे पर्यंत त्या-त्या आर्थिक वर्षांत आयोजित उपक्रमांचा अहवाल विहित नमुन्यात सादर करणे बंधनकारक आहे. सदर मुदतीत वार्षिक अहवाल सादर न केल्यास नोंदणीपत्र निलंबित केले जाईल. | |
| **नामिका सुची** | |

| | |
|---|---|
| जमीन, हवा आणि पाणी या माध्यमातील साहसी उपक्रमातील तज्ज्ञांची एक नामिका सूची संचालक, पर्यटन तयार करतील. या तज्ज्ञांची निवड विशिष्ट निकषांवर आधारित असेल. अशा नामिकासुचीतील तज्ज्ञ राज्यस्तरीय आणि विभागीय समित्यांवर सदस्य म्हणून नेमले जातील. अशी नामिकासुची सदर शासन निर्णय झाल्यापासून सहा महिन्याच्या आत जाहीर करण्यात येईल. | नामिकासूची राज्यस्तरीय समितीने मान्य करावयाची आहे. नामिकासूचीतील तज्ञांच्या निवडीसाठी निकष शासनाने जाहीर करणे गरजेचे आहे. |
| अशी नामिकासुची आणि त्याचे निकष तयार करण्यासाठी तिन्ही माध्यमातील साहसी उपक्रमातील तज्ज्ञांची एक तात्पुरती समिती गठीत करण्यात येईल. | |
| **तपासणी व दंडनीय कार्यवाही** | |
| संचालक अथवा उपसंचालक, पर्यटन संचालनालय यांनी स्वत: किंवा प्राधिकृत केलेले अधिकारी यांना प्रत्यक्ष ~~व्यवसायाच्या ठिकाणी आणि नोंदणीकृत कार्यालयाच्या ठिकाणी~~ तपासणी करण्याचा अधिकार राहील, असे अधिकारी कोणतीही पूर्वसूचना न देता साहसी पर्यटनाकरिता वापरण्यात येणाऱ्या साधन सामुग्री व पर्यटनाकरिताच्या सुरक्षा उपाययोजनांची पाहणी करु शकतील. | तपासणी कारवाई कमी जाचक असावी.<br><br>व्यवसायाच्या ठिकाणी आणि नोंदणीकृत कार्यालयाच्या ठिकाणी' ऐवजी 'उपक्रमाच्या ठिकाणी' पाहिजे<br><br>तपासणी करणाऱ्या गटात त्या साहसी उपक्रमातील तज्ञ व्यक्ती असणे आवश्यक आहे |
| **दंडास पात्र** | |
| 1. अनोंदणीकृत संस्था | |
| 2. सुरक्षा उपाययोजनांबाबत ठरविण्यात आलेल्या मानकांचे उल्लंघन | |
| 3. तपासणी पथकांकडून सेवा देणाऱ्यांबाबत प्रतिकूल अहवाल प्राप्त झाल्यास. | |
| 4. प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध नसल्यास. | |
| 5. या धोरणांतर्गत पालन करावयाच्या बाबींचे पालन होत नसल्यास | |
| वरील बाबी आढळून आल्यास त्या दंडास पात्र राहतील. | |
| **दंड** | |

| | |
|---|---|
| 1. साहसी उपक्रम आयोजन करणारे जे ~~व्यावसायिक~~ विनानोंदणी/ अनधिकृत ~~व्यवसाय~~ करत असल्याचे पहिल्यांदा आढळून आल्यास त्यांना रु. 20,000/- आर्थिक दंड व साहसी उपक्रमाकरिता आयोजित करण्यात येणारे साहित्य सिल करण्यात येईल. तोच ~~व्यावसायिक~~ दुसऱ्यांदा विनानोंदणी किंवा अनाधिकृत व्यवसाय करताना आढळल्यास रु. 25,000/- आर्थिक दंड व साहसी उपक्रम आयोजित करण्यात येणारे साहित्य जप्त करण्यात येईल. तसेच ~~व्यावसायिक~~ तिसऱ्यांदा विनानोंदणी किंवा अनधिकृत ~~व्यवसाय~~ करताना आढळल्यास त्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात येईल. | दंडाच्या पूर्ण मुद्द्यात 'व्यावसायिक' ऐवजी 'आयोजक' आणि 'व्यवसाय' ऐवजी 'आयोजन' असावे<br><br>मुद्दा क्रमांक १ - २००००/- ऐवजी १००००/- असावे, २५०००/- ऐवजी १५०००/- असावे. |
| 2. नोंदणीकृत ~~व्यावसायिकांना~~ खालीलप्रमाणे दंड आकारण्यात येईल. | |
| अ. किरकोळ स्वरूपाचे उल्लंघन रु. 5,000/- | अ - किरकोळ स्वरूपाचे उल्लंघन - ५०००/- ऐवजी २०००/- असावे. |
| आ. मध्यम स्वरूपाचे उल्लंघन रु. 10,000/- | आ - मध्यम स्वरूपाचे उल्लंघन - १००००/- ऐवजी ५०००/- असावे. |
| इ. गंभीर स्वरूपाचे उल्लंघन रु. 15,000/- | इ - मध्यम स्वरूपाचे उल्लंघन - १५०००/- ऐवजी १००००/- असावे. |
| **शिक्षा** | |
| 1. वरीलप्रमाणे उल्लंघनाचे स्वरुप लक्षात घेऊन नोंदणीकृत ~~व्यावसायिकांना~~ देण्यात आलेला नोंदणीप्रमाणपत्र निलंबन/रद्द करण्यात येईल. अशा ~~व्यावसायिकांना~~ काळ्या यादीत टाकून त्यांना भविष्यात महाराष्ट्र साहसी पर्यटन सेवा देण्यास प्रतिबंधीत करण्यात येईल. पर्यटन संचालनालयामार्फत कोणत्याही प्रकारची कार्यवाही करताना साहसी उपक्रम धारकास त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल. | शिक्षेच्या मुद्द्यात 'व्यावसायिक' ऐवजी 'आयोजक' आणि 'व्यवसाय' ऐवजी 'आयोजन' असावे |
| 2. साहसी ~~पर्यटन सेवा देणाऱ्या~~ संस्था/कंपनी/व्यक्ती यांच्याकडून साहसी उपक्रमा दरम्यान पर्यटक, सामान्य नागरिक किंवा त्रयस्थ व्यक्ती यांना गंभीर ईजा / जीवितास हानी पोहोचल्यास त्यांच्यावर प्रचलित कायदे नियमानुसार स्थानिक पोलीस आवश्यक कार्यवाही करतील. | उपक्रम आयोजित करणाऱ्या' असायला हवे |
| 3. साहसी उपक्रम आयोजकांना आणि त्यातील सहभागींना लागू होणाऱ्या भारतीय दंडविधान, ग्राहक संरक्षण कायदा किंवा अन्य कोणत्याही कायद्यातील तरतुदींवर या शासन निर्णयांतर्गत केलेल्या दंडात्मक कारवाईचा कोणत्याही प्रकारे परिणाम होणार नाही. | |
| **अपील** | |

| | |
|---|---|
| नोंदणी परवाना/निलंबन रद्द बाबत उपसंचालक (पर्यटन) यांच्यामार्फत करण्यात आलेल्या शिफारशीसंदर्भात संचालक, पर्यटन संचालनालय यांच्याकडे 30 दिवसांच्या आत अपील करता येईल. | |
| संचालक, पर्यटन संचालनालय यांनी दिलेल्या निर्णयाविरुद्ध 30 दिवसांच्या आत प्रधान सचिव (पर्यटन) यांच्याकडे द्वितीय अपील करता येईल. सचिव (पर्यटन) यांनी दिलेला निर्णय अंतिम राहील. | |
| **साहसी ~~पर्यटन~~ धोरणाची परिणामकारक अंमलबजावणीकरिता राज्यस्तरीय समिती गठीत करण्यात येत आहे. राज्यस्तरीय समितीची रचना व कार्यकक्षा खालीलप्रमाणे** | उपक्रम |

**साहसी पर्यटन धोरण व अंमलबजावणीकरिता राज्यस्तरीय समिती**

| अनु.क्र. | पदनाम | समितीमधील पद |
|---|---|---|
| 1 | प्रधान सचिव, पर्यटन | अध्यक्ष |
| 2 | पोलीस महासंचालक अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या वरिष्ठ दर्जाचा प्रतिनिधि महाराष्ट्र राज्य | सदस्य |
| 3 | मुख्य वन संरक्षक अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या वरिष्ठ दर्जाचा प्रतिनिधि, नागपूर | सदस्य |
| 4 | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड (MMB CEO) | सदस्य |
| 5 | सहसचिव जलसंपदा | सदस्य |
| 6 | संचालक, पर्यटन संचालनालय | सदस्य |
| 7 | पर्यटन संचालनालयाच्या नामिकासुचीतील तज्ञ. (3 + 1 +1 अनुक्रमे जमीन, हवा, पाणी क्षेत्रातील तज्ञ) | सदस्य |
| 8 | सहसंचालक, पर्यटन संचालनालय | सदस्य सचिव |

| | |
|---|---|
| **साहसी पर्यटन धोरण व अंमलबजावणीकरिता राज्यस्तरीय समितीची कार्यकक्षा** | |
| 1. राज्यात सर्व साहसी उपक्रमांचा सर्वांगीण विकास, योग्य व सुरक्षित पद्धतीचा वापर करणे व उपाययोजना आखणे. | |
| 2. साहसी उपक्रमात होणाऱ्या अपघातांची चौकशी करण्याची पद्धती व प्रक्रिया ठरविणे. | |
| 3. तक्रारीच्या निवारणासाठी करावयाची कार्यपद्धती ठरविणे. | |

| | |
|---|---|
| 4. विभागीय साहसी ~~पर्यटन~~ समितीच्या कार्यकक्षेमध्ये आवश्यक असल्यास सुधारणा सुचविणे. | उपक्रम |
| 5. साहसी उपक्रम धोरणाची योग्य अंमलबजावणीसाठी शासनास सर्वतोपरी सहाय्य करणे. | |
| 6. साहसी ~~पर्यटनावर~~ सर्वांगीण वाढ व प्रसारासाठी धोरणाचा आराखडा तयार करणे. | उपक्रमांवर |
| 7. कालानुरूप व आवश्यकतेनुसार याबाबत नवीन साहसी उपक्रमांना मान्यता देणे व सुधारणा सुचविणे. | |
| 8. या धोरणाची व्यवस्थित कालबद्ध अंमलबजावणी करण्यासाठी उपाययोजना. | |
| 9. या समितीच्या त्रैमासिक बैठका आयोजित करून अंमलबजावणीबाबत आढावा घेणे. | |
| 10. साहसी क्षेत्रात घडणारे बदल लक्षात घेऊन शासनातर्फे वेळोवेळी या सूचना प्रकाशित करण्यात येतील. हे बदल तज्ञांच्या सल्ल्याने करण्याचा अधिकार राज्यस्तरीय समितीला असेल. | |
| 11. महाराष्ट्रातील नावीन्यपूर्ण साहसी ~~पर्यटन~~ प्रकल्पांना राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध माध्यमांद्वारे प्रसिद्धीबाबत मार्गदर्शन करणे. | उपक्रम |
| 12. नोंदणीकृत साहसी ~~पर्यटन~~ संस्थांना तारांकित दर्जा देण्यासंदर्भातील मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करेल. | उपक्रम |
| 13. या धोरणांतर्गत साहसी उपक्रम नोंदणी / नूतनिकरण व त्याकरिता विविध विभागांच्या (वन, पुरातत्व, पाटबंधारे, गृह इत्यादी) परवानगी मिळणे सुलभ होण्याकरिता एक-खिडकी यंत्रणा निर्माण करेल | मुद्दा क्रमांक १३ - MMB, DGCA सारख्या संस्था ह्यांचा समावेश असावा. |
| 14. तज्ज्ञ लोकांची नामिकासूची तयार करताना पर्यटन संचालनालयास मार्गदर्शन करणे. | |
| पर्यटन धोरण 2016 अन्वये साहसी पर्यटनाकरिता देण्यात येणारे विविध प्रोत्साहन लागू राहतील. | |

| | |
|---|---|
| साहसी ~~पर्यटन~~ धोरण संघटित रित्या साहसी उपक्रम (व्यावसायिक किंवा ना नफा ना तोटा तत्वावर) राबविणाऱ्या सर्व संस्था/व्यक्तींना लागू राहील. वैयक्तिकरित्या किंवा लहान गटात (कमाल 5 व्यक्ती) स्वत: गिर्यारोहण अथवा प्रस्तरारोहणास जाणाऱ्या व्यक्तींनी सुरक्षेच्या दृष्टीने शक्यतो नोंदणीकृत संस्था/व्यक्तींकडूनच सुरक्षेच्या कारणास्तव सहभागी व्हावे, तथापि नोंदणीकृत संस्था/व्यक्तींशिवाय अशा साहसी उपक्रमात सहभागी झाल्यास अशा व्यक्तींना / लहान गटांनी स्वत:च्या पातळीवर या धोरणांतर्गत नमूद सर्व सुरक्षेच्या दृष्टीने सर्व उपाययोजना करणे ~~बंधनकारक राहील~~. | वैयक्तिक रित्या किंवा खाजगी गटाने शिखर चढाई मोहीमा, प्रस्तरारोहण मोहीमा तसेच पाणी अणि हवा ह्या माध्यमातील साहस मोहीमा ह्यांना सदर धोरण लागू नाही. अशा मोहीमेतील सदस्य संख्या ५ वर मर्यादीत न करता ही अट शिथील करावी. अशा मोहीमांना सदर मसुद्यातील मार्गदर्शक सुचना बंधन कारक नसून, सुरक्षिततेसाठी त्यांची शिफारस करावी. |
| गिर्यारोहण, प्रस्तरारोहणासाठी महाराष्ट्राबाहेरील संस्थांनी महाराष्ट्रातील ठिकाणी महाराष्ट्रातील भौगोलिक सीमेमध्ये समाविष्ट असलेल्या ठिकाणी कोणताही साहसी उपक्रम राबवायचा असल्यास त्यास या धोरणाअंतर्गत नोंदणी करणे बंधनकारक राहील. | |
| वैयक्तिकरित्या सामाजिक माध्यमांचा वापर करून सहभाग नोंदविणाऱ्या व्यक्तींनाही या धोरणांतर्गत नोंदणी बंधनकारक राहील. विना नोंदणी अशा साहसी उपक्रमाची आखणी व कार्यवाही केल्यास त्यावर अनधिकृत व्यवसायाबाबतची कारवाई करण्यात येईल. | |
| जमिनीवरील क्रीडा प्रकारातील गिर्यारोहण, गिरीभ्रमण अशा उपक्रमांचे राखीव संरक्षित वने, सार्वजनिक उद्याने व अभयारण्ये या ठिकाणी जर उपक्रम राबवायचा असल्यास वन विभाग तसेच, केंद्रीय पुरातत्व विभाग व राज्य पुरातत्व विभाग यांच्या अखत्यारीतील स्थळांबाबत त्या त्या विभागाचे प्रचलित कायदे व नियमाचे पालन करणे बंधनकारक राहील. जल साहसी क्रीडा प्रकारात समुद्र व खाडीवरील साहसी ~~पर्यटन~~ प्रकार याकरिता महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड (MMB) यांची त्यांचे जलक्रीडा धोरणातील नमूद नियम व नियमावली बंधनकारक राहील. (Snorkelling/Scuba Diving वगळून) त्याचप्रमाणे राज्यातील धरणांमधील साहसी ~~पर्यटन~~ प्रकाराकरिता जलसंपदा/ जलसंधारण विभाग/स्थानिक स्वराज्य संस्था यांची परवानगी घेणे आवश्यक राहील. | निसर्ग सहली, सफारी इ. उपक्रमांसाठी वन विभाग व संलग्न शासकीय संस्था ह्यांच्या प्रचलीत, सक्षम मार्गदर्शक सुचनांचा समावेश करावा. |

| | |
|---|---|
| साहसी ~~पर्यटन~~ प्रकाराच्या अनुषंगाने केंद्र/राज्य सरकारच्या ज्या विभागांची परवानगी आवश्यक असेल त्या सर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील. | उपक्रम |

**महत्वाच्या सूचना:**

१. मसुद्यात अनेक ठिकाणी 'साहसी पर्यटन' अशी शब्दयोजना आलेली आहे. गोंधळ टाळण्यासाठी त्या ठिकाणी 'साहसी उपक्रम' असा बदल करावा.

२. महाराष्ट्रातील आयोजकाला इतर राज्यात साहसी उपक्रम आयोजित करावयाचे असल्यास नोंदणी करण्याबरोबर 'जिथे उपक्रम आयोजित केला जाईल तेथील स्थानिक नियम आणि सुरक्षा सूचना' पाळण्याची हमी देणे आवश्यक आहे. (साहसी क्षेत्रात GR हा विषय मुळात महाराष्ट्रातून हिमालयात पदभ्रमणासाठी गेलेल्या सहभागी व्यक्तीच्या मृत्यूमुळे सुरु झाला आहे.)

३. "हिमालयातील शिखरांवर चढाईसाठी आयोजित मोहिमा, इतर ठिकाणी प्रस्तरारोहणासाठी जाणाऱ्या मोहिमा (स्वत:च्या जबाबदारीवर जाणाऱ्या / **स्वत:च्या सुरक्षेची जबाबदारी स्वत:वर असणाऱ्या मोहिमा**) यांना सदर धोरण लागू नसेल" - हा मुद्दा अतिशय स्पष्टपणे मांडला जावा.

४. जेव्हा आयोजक सहभागींसाठी साहसी उपक्रम आयोजित करतात, तेव्हा **सहभागींच्या सुरक्षेची जबाबदारी आयोजकांवर हस्तांतरित होते** - हे साहसी उपक्रम धोरण अशा सर्व आयोजकांसाठी लागू आहे - हा मुद्दा अतिशय स्पष्टपणे मांडला जावा.